
Impact Factor : 2.4772

ISSN 2348-2702

# APOORV KNOWLEDGE

## International Journal of Multidisciplinary Research

September 2016 Vol. I Issue XII



• EDITOR-IN-CHIEF •
Dr. Vandana Bankar
• EDITOR •
Dr. S. K. Sarje

Impact Factor : 2.4772, ISSN : 2348-2702, Vol-I, Issue-XII

६. . . .

# नामांतर चळवळ आणि दलित साहित्य

प्रा.डॉ.मनोहर सिरसाट
संशोधक मार्गदर्शक
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, धारूर

प्रा. अरुणकुमार लेमाडे
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

१९४८ पर्यंत मराठवाडा निझामाच्या जुलमी राजवटीखाली भरडला जात होता. देशाला स्वातंत्र्य मिळून एक वर्ष झाले तरी निझाम स्वराज्यात विलीन होण्यास तयार नव्हता त्यामुळे निझाम मीर उस्मान अली भारत सरकारचे लक्ष्य बनला होता. तेव्हापासून मुस्लीम संघटनांचा हैदराबाद संस्थानातील प्रमुख कासिम रझवी निझामाला आणि त्याच्या राजवटीला बळ देण्याचेच काम करीत होता. निझामी राजवटीचे जुलूम, दडपशाही आणि अस्पृश्यता अशा कैचीत इथली दलित जनता सापडली होती. बाबासाहेबांनी निझाम हा अस्पृश्यांचा आणि मातृभूमीचा शत्रू असल्याची भूमिका एका पत्रकात विशद केली. निझामाच्या राजवटीत मराठवाडा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला प्रदेश होता. या पार्श्वभूमीवर शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या हैदराबाद संस्थानात शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. १९५८ मध्ये औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले. विद्यापीठ स्थापनेपूर्वी विद्यापीठ स्थापनेसाठी विद्यापीठ समितीची स्थापना झाली होती. भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र राज्य अस्तित्वात यायचे होते त्यावेळी बॉम्बेसरकार किंवा मुंबई प्रांत असा त्याचा उल्लेख होत असे व मुंबई सरकारचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हेच होते. २७ एप्रिल १९५७ रोजी स्थापन झालेल्या विद्यापीठ समितीने विद्यापीठाच्या नावासंदर्भात प्रस्ताव शासनाकडे दाखल केला. त्यात सुचविलेल्या नामांमध्ये छ. शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव होते. नामांतराची चळवळ १९७७ मध्ये सुरू झाली. दरम्यान कोल्हापूर येथे स्थापन झालेल्या विद्यापीठाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आले. म. फुले आणि पंजाबराव देशमुखांच्याही नावानेही विद्यापीठे महाराष्ट्रात अस्तित्वात आली. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या उच्च विद्याविभूषित, महाराष्ट्रात शैक्षणिक सुधारणांसाठी झटणाऱ्या महामानवाचे नाव एखाद्या विद्यापीठास देण्याचा कोणासही सुचले नाही शासनानेही डॉ. बाबासाहेबांच्या नावाने विद्यापीठीय स्मारक निर्माण करण्याचा विचार कधी केला नाही. या पार्श्वभूमीवर मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी जोर धरू लागली. मिलिंद महाविद्यालयाची स्थापना होऊन दलित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला प्रारंभ झाला होता. १९५८ मध्ये औरंगाबादेत विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, जमातींच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत १९७५ पर्यंत प्रचंड वाढ झाली होती. १९७७ मध्ये विद्यापीठ नामांतराची चळवळ सुरू झाली हे खरे असले तरी २८ जून १९७४ रोजी "मराठवाडा रिपब्लिकन विद्यार्थी संघाने मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मराठवाड्यातील दोन विद्यापीठांपैकी एकास डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे. अशी मागणी केली होती. या संघाचे अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र वाकुळे यांना मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयातून याबाबत पोचही आली होती." (नामांतर लढा एक शोधयात्रा - सुधीर गव्हाणे, पृष्ठ २०) या सर्व बाबींचा परामर्श घेताना नामांतर चळवळीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

राजा ढाले यांनी दलित पँथरच्या बरखास्तीची केलेली घोषणा पँथरच्याच अन्य पदाधिकाऱ्यांना मान्य नव्हती. पँथर बरखास्त न होऊ देता ती पुढेही कार्यरत राहावी या हेतूने औरंगाबादेत बैठक झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी रामदास आठवले होते. दलित पँथरची नवी कार्यकारिणी अस्तित्वात आली अरुण कांबळे हे दलित पँथरचे नेतृत्व आले तर सरचिटणीसपदी गंगाधर गाडे होते. पँथरचे नवनिर्वाचित सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी ७ जुलै १९७७ रोजी केली. १७ जुलै १९७७ रोजी डॉ. शशी अहंकारी यांच्या अध्यक्षतेखाली

सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या बैठकीस औरंगाबाद शहरातील विविध विद्यार्थी संघटना व युवक संघटना सहभागी झाल्या होत्या. या बैठकीत 'विद्यार्थी कृती समिती' गठित करण्यात आली. समितीने १८ जुलै ७७ रोजी 'महाविद्यालय बंद' चे आवाहन केले. वैद्यकीय महाविद्यालयातील जागा वाढवणे, राखीव जागा भरणे आदींसह मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशीही मागणी होती. या मागणीसाठी सर्वपक्षीय विद्यार्थी कृती समितीने १८ जुलै १९७७ रोजी विद्यापीठावर मोर्चा काढला. या मोर्चात राम गायकवाड, गणेश कोंडेकर, प्रवीण वाघ, श्रीरंग वारे, ज्ञानोबा मुंडे यांच्यासह अन्य कार्यकर्ते सहभागी झाले होते. याच दिवशी प्राचार्य संदनशिव यांच्या नेतृत्वाखाली मागासवर्गीय विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांचा मोर्चा निघाला व गंगाधर गाडे यांच्या नेतृत्वाखाली पँथरचा मोर्चाही निघाला. मोर्चातील सहभागी प्रतिनिधींनी विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य आमदार किशनराव देशमुख, डॉ. भगतसिंह राजूरकर, वसंत काळे, डॉ. पुरुषोत्तम दरख, प्राचार्य राजाराम राठोड यांना निवेदन दिले. त्यांनीही नामांतर ठरावाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रकांड पांडित्याच्या सन्मान करणारे पुरोगामी महाराष्ट्रातील बडे-बडे नेते एकत्र येऊन नामांतराला पाठिंबा देत होते. त्यामध्ये प्राचार्य म. भि. चिटणीस, समाजवादी नेते एस.एम.जोशी याचा उल्लेख करावा लागतो. परंतु याच पुरोगामी महाराष्ट्रात विद्वानाची विद्वत्ता त्याच्या जातीवरुन निश्चित करणारे काही धुरीण प्रतिगामीही राहात होते. याचा प्रत्यय नामांतर लढ्याने आणून दिला. 'नामांतर विरोधी कृती समीती'च्या माध्यमातून त्यांनी नामांतराचा विरोध केला. नामांतर विरोधी पहिला मोर्चा २१ जुलै १९७७ रोजी निघाला होता. परिणाम स्वरूप हा लढा केवळ सामाजिक राहिला नाही तर त्याने राजकीय रूप धारण केले. २० ऑगस्ट १९७७ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील औरंगाबाद येथे आले. प्रीतमकुमार शेगावकर यांनी ३०० कार्यकर्त्यांचा मोर्चा सुभेदारी विश्रामगृहावर नेऊन मुख्यमंत्र्यांनी नामांतराच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी औरंगाबादेत बैठक बोलावली. ८ सप्टेंबर १९७७ रोजी झालेल्या या बैठकीस पार्लमेंटरी कमिटीच्या अहवालानुसार गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर, बजरंगलाल शर्मा, गोविंदभाई श्रॉफ यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत विद्यापीठाच्या नामांतराबद्दल अनुकूलता दर्शवण्यात आली.

दरम्यान नामांतर वाद-विरोधाचे रण पेटले. नामांतरवाद्यांच्या अस्मितेचा प्रश्न झाला तर दुसऱ्या बाजूला नामांतर विरोधकांनी हा प्रश्न मराठवाड्याच्या अस्मितेचा केला. १९३८ मध्ये निझामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठी तरुणांची चळवळ उभी करणारे गोविंदभाई श्रॉफ विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव दिल्याने मराठवाड्याची अस्मिता दुखावेल अशी भूमिका घेतली. अनंतराव भालेरावांसारख्या 'मराठवाडा' दैनिकाच्या संपादकाने उघड उघड नामांतर विरोधाची भूमिका घेतली तर नांदेडचे सुप्रसिध्द विचारवंत, समीक्षक प्राचार्य नरहर कुरुंदकरही 'विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यास माझा पाठिंबा नाही' असे म्हणत नामांतरविरोधी गटात सामिल झाले.

नामांतर लढ्यात दलित-सवर्णांनी एकत्र येऊन नामांतराची चळवळ केली पाहिजे असे म.भि.चिटणीस यांना वाटत होते. त्यांनी दलित-सवर्ण वर्गातील लोकांना एकत्र करुन 'विद्यार्थी-नागरीक कृती समिती' स्थापन केली. समितीचे अध्यक्ष स्वत: म.भि.चिटणीस होते. कार्याध्यक्ष बाबा दळवी, संघटक फ.मुं.शिंदे याशिवाय सुभाष लोमटे, प्रकाश वांगीकर, तकी हसन खान, डी.एल. हिवराळे, बापूराव जगताप ही मंडळी होती. सह्यांची मोहीम, बैठक, सत्याग्रह इत्यादी आंदालन नामांतराच्या बाजूने राहून या मंडळींनी केली. औरंगाबादच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी अनुकूलता दर्शवूनही पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही, त्यामुळे वसंतदादांच्या बीडच्या सभेत पँथर्सने घोषणाबाजी केली. तिथे वसंतदादांनी कोणत्याही स्वरूपाचे नामांतर होणार नसल्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय बोलून दाखविला. त्यामुळे विरोधक सुखावले तर नामातर समर्थक नाराज झाले. मुख्यमंत्र्यांचा निषेध करणारी पत्रके काढून नामांतर समर्थकांनी निषेध केला.

१९७८ मध्ये नामांतरवादी आंदोलनाचे उग्र रूप धारण केले. त्याची झळ खेड्या-पाड्यांतील दीन-दुबळ्या दलितांना स्त्रियांना सोसावी लागली, सवर्ण-दलितांत रणकंदन सुरू झाले. दलितांच्या झोपड्या जाळण्यात

आल्या. स्त्रियांच्या अब्रूशी सनातनी खेळले. सुगाव (नांदेड), टेंभुर्णी (जि.परभणी) व धामणगाव (जि. परभणी) येथील अनुक्रमे जनार्दन मवाडे, आयु. पोचीराम कांबळे, संभाजी आणि सोमाजी अशा तिघांची हत्या नामांतराच्या लढ्यातील त्यांच्या सहभागामुळे झाली. नामांतराचा प्रश्न समोर ठेवून झालेल्या दलित सवर्ण दंगलीत दोन हजार झ ोपड्या मराठवाड्यात जाळल्या गेल्या. अनेक स्त्रियांची बेअब्रू झाली.

नामांतराच्या चळवळीचे लोण संबंध महाराष्ट्रभर पोचले मराठवाड्यासह मुंबई-पुणे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातही हे लोण पोहोचले होते. १९६७ मध्ये रा.सु.गवई यांनी काढलेल्या आंबेडकर महाविद्यालयातील कॉमर्सचे प्राध्यापक असलेल्या प्रा. जोगेंद्र कवाडे यांनीही नामांतरवादी कृती समिती स्थापन केली होती. १९७९ मध्ये त्यांनी नागपूर येथून मराठवाड्यातील अ ौरंगाबादपर्यंत 'लॉंग मार्च' काढला. नामांतरविरोधी दलित-मागासवर्गीयांत जनजागृती घडवून आणण्याच्या प्रयत्नांचा व लढ्याची तीव्रता शासनापर्यंत पोचविण्याचा त्याचा हा मार्ग तमाम महाराष्ट्रासाठी नवा होता. 'लॉंग मार्च'मध्ये माणूस जोडला जात होता. छोटेखानी हा मोर्चा पाहता-पाहता दोन लाख लोकसंख्येचा झाला. तीन वर्षांच्या मुलापासून तो पंचाहत्तर वर्षाच्या म्हाताऱ्यापर्यंत या मोर्चातील लोक सहभाग विलक्षण होता. स्त्रियाही मोठ्या संख्येने 'मार्च' मध्ये सहभागी होत्या. अनेक स्त्रिया तर आपल्या दूधपित्या मुलांना कडे-काखेवर घेऊन मोर्चात सहभागी झाल्या होत्या. कायदा-सुव्यवस्थेच्या नावाखाली शासनाने हा मोर्चा शेवटपर्यंत पोचू दिला नाही. लाठी चार्ज, अश्रुधूर प्रसंगी गोळीबार करुन हा मोर्चा विस्कटून टाकला. कवाडे सरांना अटक झाली. अनेक कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावासाठी निघालेल्या निःशस्त्र लोकांचे सनदशीर आंदोलन शस्त्राधारे पोलीस आणि शासनाने चिरडून टाकले. पण त्यामुळे जोगेंद्र कवाडे यांचे नाव संबध महाराष्ट्रात झाले.

या घटनेआधी एक वर्ष २७ जुलै १९७८ रोजी शरद पवार मुख्यमंत्री असताना विधिमंडळाच्या दान्ही सभागृहात नामांतराचा ठराव पास करण्यात आला होता. वसंतदादांनी जे केले ते पवारांकडूनही घडू नये, दलितांच्या अस्मितेचा झालेला हा प्रश्न अधिक ताणला जावू नये यासाठी केलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून 'लॉंग मार्च' कडे पाहता येते. पण व्हायचे तेच झाले. वातारवण अनुकूल नसल्याचे सी.आय.डी. चे रिपोर्ट पुढे करुन पवारांनी हा प्रश्न तिष्ठत ठेवला. दोन्ही सभागृहात ठराव पास होऊनही प्रत्यक्ष नामांतर होण्यासाठी १६ वर्षांचा काळ जावा लागला. १४ जानेवारी १९९४ रोजी शरद पवार हेच राज्याचे मुख्यमंत्री असताना नामविस्तार झाला. मराठवाडा विद्यापीठाऐवजी 'डॉं. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' या नावाने मराठवाड्यात डॉ. बाबासाहेबांच्या नावाचे विद्यापीठीय स्मारक अस्तित्वात आले. नामांतराच्या चळवळीला नामविस्ताराने मिळालेला प्रतिसाद हा चळवळीचा विजय मानायचा की पराजय हा भाग अलाहिदा. परंतु स्वातंत्र्य चळवळीनंतर स्वातंत्र्योत्तर काळात जवळ जवळ वीस वर्षे एवढा प्रदीर्घ काळ चाललेला हा एकमेव लढा होता. नामांतराच्या चळवळीने अक्षरमित्र झालेल्या दलितांच्या प्रतिमेला आवाहन केले. उत्स्फूर्त वेदनांचे ज्वालाग्रही रूप शब्दांतून प्रकटले, कविता होऊन ठसठसणाऱ्या वेदनेच्या हुंकाराला जन्म मिळाला. नामांतराने दिलेली जखम शब्द-शब्दांतून अंकुरली. शरणकुमार लिंबाळे लिहितात -

कुण्या पानिपताकडे
हा पोचीराम पळत आहे ?
अजिंठ्यातलं एक लेणं 'सोन्याच्या लंकेत'
असं एकाकी का जळतं रे (उत्पात)

हाच तर चळवळींचा साहित्याशी असलेला अनुबंध होय. नामांतरांच्या चळवळीचे वाड्मयाला योगदान काय ? या प्रश्नाचे उत्तर नामांतराच्या चळवळीने चळवळीच्या कवितेला जन्म दिला असे देता येईल.

...✍

## संदर्भ


१. नामांतर पर्व - रतनकुमार पंडागळे
२. नामांतर लढा एक शोधयात्रा - सुधीर गव्हाणे
३. चळवळीची कविता - भालचंद्र फडके
४. जोगेंद्र कवाडे यांच्या मुलाखती - धनजंय दहाट